धुळे महानगरपालिका
मालमत्ता व्यवस्थापन (बाजार विभाग)
ई ऑक्शन क्र. १२ सन २०२६-२७
तिसरी फेर निविदा : चौथी वेळ

# कार्यालयीन टिपणी

दि.30 ०९ - २०२६

विभाग - बाजार विभाग

विषय - धुळे मनपा धुळे मनपा मालकीचे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुल येथील भाजी मार्केट मधील गाळा क्र. १ ते १२, १५ ते २८, ३१ ते ४४ असे एकुण ४० गाळयांकरिता प्रतिसाद नसल्याने १० दिवसांची मुदतवाढ देणेबाबत.

मे. सादर,

धुळे महानगरपालिकेच्या बाजार विभागामार्फत उपरोक्त कामाची जाहिरात दै. देशदुत व श्रमराज्य या वृत्तपत्रातुन व्यापक प्रसिध्दी देऊन शासनाचे संकेतस्थळ https://eauction.gov.in या संकेतस्थळावर दि. ३१-०७-२०२६ पासुन सकाळी. ११.०५ प्रसिध्दीस (अपलोड) करण्यांत आले आहे.

उपरोक्त ई ऑक्शनमध्ये सहभागी होणेकामी व ऑनलाईन (तांत्रिक लिफाफा क्र. १) पध्दतीने कागदपत्रे सादर करणेकामी दि. २०-०८-२०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यंत मुदत देण्यांत आलेली होती.

या निविदेत गाळा क्र. २२,२३,२४ २५,२६ २७,२८ ३१,३२ ३३,३४ ३५,३६,३७ ३८,३९,४० ४१,४२ ४३,४४ असे एकत्रित गाळयांपैकी पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने

पहिली फेर निविदा : दुसरी वेळ १० दिवसांकरिता देणेकामी मा. उपायुक्त सो. धुळे मनपा यांनी दि. २४ / ०८ /२०२६ रोजीच्या टिपणीस मंजुरी देण्यांत आलेली आहे.

दुसरी फेर निविदा तिसरी वेळ १० दिवसांकरिता देणेकामी मा. उपायुक्त सो. धुळे मनपा यांनी दि. १० / ०९ /२०२६ रोजीच्या टिपणीस मंजुरी देण्यांत आलेली आहे.

तिसरी फेर निविदा : चौथी वेळ १० दिवसांकरिता देणेकामी मा. उपायुक्त सो. धुळे मनपा यांनी दि.30 / ९ /२०२६ रोजीच्या टिपणीस मंजुरी देण्यांत आलेली आहे.

उपरोक्त गाळयांना पुरेसा प्रतिसाद मिळालेला नसल्याने तिसरी फेर निविदा : चौथी वेळ खालील दिनांकासह दर्शविण्यांत येत आहे.

सदर कामाची Last Date of Submission of Bid (तांत्रिक लिफाफा क्र. १) अनुषंगीक कागदपत्रे डी.डी. सह अपलोड करणे करिता दि.१५/ १०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत देण्यांत आली होती.

तसेच इच्छुक लिलावधारकांची पात्रता निश्चित करणे व दस्तऐवज बाबतची महानगरपालिकेकडुन पडताळणी दि.१६/१०/ २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासुन ते दि.२३ / १० / २०२६ सायं. १७.०० वाजेपर्यंत राहील.

प्रत्यक्ष लाईव्ह ई ऑक्शन दि.२४/ १०/२०२६ रोजी सकाळी ११.०५ ते दि.२४ / १० /२०२६ सायं. १७.०० वाजेपर्यंत राहील.

**टिप** :- विहित कालावधीत ऑनलाईन अपलोड/ सादर केलेले कागदपत्रे व मुळ डी.डी. सह इकडील कार्यालयाकडेस बंद पाकिटात दि.१५/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०५ ते सायं. १७.०० वाजेपर्यत सादर करणे बंधनकारक राहील.

केवळ पात्र लिलावधारकांना या लाईव्ह ई ऑक्शन मध्ये सहभागी होता येईल.

उपरोक्त ई लिलाव सुचनेबाबत अधिकचा तपशील https://eauction.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

उपायुक्त
धुळे महानगरपालिका